# संबंधामध्ये दुरावा आणि जवळीक

मानव समाज परस्पर संबंधावर आधारित आहे आणि हे संबंध प्राप्तीच्या आधारे बनतात. प्राप्ती आणि अप्राप्ती व्यक्तीला प्रिय आणि अप्रिय बनविते. जरूरी नाही की प्राप्ती धनाची किंवा साधनाची असावी. ही प्राप्ती स्नेह, सम्मान, सुख, समाधानाचीही असू शकते आणि ही प्राप्ती जवळीक किंवा दुराव्याचा आधार आहे.

जे अप्रिय वाटतात लोक त्यांच्यापासून दूर जातात, जे प्रिय वाटतात त्यांच्याजवळ येतात. संसाररूपी नाटकात हा खेळ चालूच असतो कधी संबंध जोडण्यात आम्ही फसतो, तर कधी दुरावा का ठेवला ? याचा पश्चाताप करतो.

संत तुलसीदासांचा दोहा आहे ''सारे, नर मुनि सबकी यह रिति - स्वास्थ्य ाग कर सब प्रिती'' अर्थात स्वार्थावरच संबंध टिकतात. अर्थातच आा पती-पत्नी जे एक दुसऱ्यांचे जीवन साथी आहेत. तेतर आपल्या मनोकामना इच्छा एक दुसऱ्यांकडून पूर्ण होत नसतील तरे वेगळे होतात. मित्र-संबंध स्वार्थापोटीच संबंध ठेवतात तर साधु-संतदेखील दान-दक्षिणा प्राप्तीपर्यंतच यजमानांशी जवळीक ठेवतात.

संस्थात दुरावा आणि जवळीक यांचे अजून एक कारण म्हणजे स्वभाव संस्कारातील समानत, जसे खेळाडूंची दोस्ती खेळाडूंशी आणि जुगाराची दोस्ती जुगारीशी होते. तसेच जिथे संस्कार मिळत नाहीत तिथे जवळ आलेले लोकही दूर जातात. कधी कधी तर अशी वेळ येते की काही कारणामुळे एकमेकांशी संबंध येतात किंवा दुरावा निर्माण होतो. काही वेळेस उद्देश प्राप्तीसाठी ही जवळीक ठेवल्या जाते. मग जरी स्वभाव संस्कार जुळत नसतील तरी आपण पाहतो, राजनीती व्यापार जगतात स्वार्थ आणि फायद्यासाठी जवळीक आणि दुरावा क्षणाक्षणाला बदलत असतो.

सर्वशक्तीवान परमात्मा परम पवित्र आणि परम पारखी आहे. ते मनुष्यात्म्यांना या कलीयुगाच्या अंतिम वेळी ज्ञान देत आहेत की कशापासून दूर राहा आणि जवळीक कुठे करा. त्यांचे आवाहन आहे की हे आत्मन कोणतीही व्यक्तीवाईट नाही पण काम, क्रोध, मोह, अहंकार या विकारांच्या आधीन झाल्यामुळे व्यक्ती चांगला किंवा वाईट बनतो. म्हणून कुणाचीही घृणा किंवा अति जवळीक आपण असणं बरोबर नाही. तुम्ही विकर्म, दुर्व्यसन, अवगुणांपासून दूर आणि ज्ञान, गुण, सदाचार आणि सतकर्माशी जवळीक करा तरच आत्म कल्याण होईल.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात दिले जाणारे ज्ञान या सुखदाई संबंधाचे भंडार उघडणारी चावी आहे आणि त्यावर प्रत्येकांचा हक्क आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com